राज्य उत्पादन शुल्क विभागातील अस्थायी पदांना दि.०१.०९.२०२३ ते दि.२९.०२.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. इएसटी-१७१७/ प्र.क्र.४४/ राउशु-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २७ सप्टेंबर, २०२३

**वाचा:** १) शासन निर्णय, गृह विभाग क्र. इएसटी २००२/प्र.क्र.९६/इएक्ससी-४, दि.०१.०१.२००३.
२) शासन निर्णय, गृह विभाग, इएसटी-१६१६/प्र.क्र.२००/राउशु-१, दि.०२.०९.२०२१.
३) शासन निर्णय, गृह विभाग क्र. इएसटी-१७१७/प्र.क्र.४४/राउशु-१, दि.२५.१०.२०२१.
४) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.बीजीटी-१०२१/प्र.क्र.९६/राउशु-१, दि.०५.०१.२०२२.
५) शासन निर्णय, गृह विभाग क्र. इएसटी-१७१७/प्र.क्र.४४/राउशु-१, दि.१२.१०.२०२२.
६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०८.०२.२०२३.
७) आयुक्त, राउशु, मुंबई यांचे पत्र क्र. इएसटी ११२०२२/मुदतवाढ/ २०२२-२३/१/२-क, दि.२४.०२.२०२३.
८) शासन निर्णय, गृह विभाग क्र. इएसटी-१७१७/प्र.क्र.४४/राउशु-१, दि.०३.०३.२०२३.
९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.३१.०८.२०२३.
१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०६.०९.२०२३.
११) आयुक्त, राउशु, मुंबई यांचे पत्र क्र. इएसटी ११२०२२/मुदतवाढ/ २०२२-२३/१/२-क, दि.०५.०९.२०२३.

**शासन निर्णय:-**

राज्य उत्पादन शुल्क विभागाचा आकृतीबंध संदर्भ क्र.१ येथील दि.०१.०१.२००३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेला आहे. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागासाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण ३६११ पदांपैकी १२२६ पदे अस्थायी आहेत. तसेच, संदर्भ क्र. २ येथील दि.०२.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्य उत्पादन शुल्क विभागाचा ३८०० पदांचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. तद्नंतर, शासन निर्णय, दि.०५.०१.२०२२ अन्वये राज्य उत्पादन शुल्क विभागातील नागपूर व औरंगाबाद या प्रादेशिक विभागांचे विभाजन करुन अनुक्रमे अमरावती व नांदेड हे दोन नवीन प्रादेशिक विभाग निर्माण करण्यात आले असून, त्याकरीता ४२ (३८ नियमित + ४ बाह्ययंत्रणेद्वारे) पदे निर्माण केली आहेत.

२. विभागाच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या, परंतु, ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना संदर्भाधीन दि.०३.०३.२०२३ च्या शासन

निर्णयान्वये दि.३१.०८.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. **आता सदर १२२६ अस्थायी पदांना दि.०१.०९.२०२३ ते दि.२९.०२.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.**

३. सदर शासन निर्णय, संदर्भ क्र.९ व १० येथील वित्त विभागाच्या अनुक्रमे दि.३१.०८.२०२३ व दि.०६.०९.२०२३ च्या शासन निर्णय व शुद्धीपत्रकान्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०९२७१७३६५८७८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANDEEP
GORAKHNATH
DHAKANE

Digitally signed by SANDEEP GORAKHNATH DHAKANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=418588839686584ca25060bf57af23a4473234ebcc421d084d8890fc37c8f673, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E7B44D71EACB46FA051532FB66A73DA715F678033161C1162FA83F6713D03552, cn=SANDEEP GORAKHNATH DHAKANE
Date: 2023.09.27 17:39:21 +05'30'

**(संदिप ढाकणे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
४) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७) मुख्य लेखा अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९) निवडनस्ती-राउशु-१.

********